# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००९३.

## <u>सुचना पत्र</u>

**विषय :- प्रवेशपत्र निर्गमित करणे तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा (ESBC) दावा केलेल्या उमेदवारांच्या संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

महामंडळातील सरळसेवेची वर्ग "क" ते वर्ग "ड" मधील १४ संवर्गातील ८६५ रिक्त पदे महापरीक्षा पोर्टल यांचेमार्फत भरणेकामी सरळसेवा भरतीची जाहिरात सोमवार दि.१५/०७/२०१९ रोजीच्या वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर भरती करीता उमेदवारांना ऑनलाईन अर्ज सादर करणे कामी दि.१७/०७/२०१९ ते दि.०७/०८/२०१९ पर्यंत मुदत देण्यात आली होती. तथापि, महाराष्ट्र राज्यातील सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील पुरजन्य परिस्थितीमुळे विहित मुदतीत अर्ज सादर करु न शकलेल्या उमेदवारांकरीता दि. २०/०८/२०१९ तेदि. २६/०८/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

उक्त पदांच्या भरतीकरीता ऑनलाईन / ऑफलाईन परीक्षा घेण्याचे नियोजन दि.२०/०८/२०२१ ते दि.१०/०९/२०२१ या कालावधीमध्ये करण्यात आले असून तत्पूर्वी उमेदवारांना परीक्षेकरीता प्रवेशपत्र (Hall Ticket) दि. १२/०८/२०२१ पासून सदर पदाची परीक्षा होईपर्यंत उपलब्ध करुन देण्यात येतील.

## सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातून (ESBC) अर्ज सादर केलेल्या उमेदवारांकरीता महत्वाच्या सूचना

मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या सिव्हिल अपील क्रमांक ३१२३/२०२० [एसएलपी (सी) १५७३७/२०१९] या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ५ मे, २०२१ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही बाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक ३१ मे, २०२१ अन्वये मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचना तसेच शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०२१/प्र.क्र.३५९/१६-ब, दिनांक ३ जून, २०२१ अन्वये शासनाकडून प्राप्त अभिप्रायानुसार संबंधित जाहिरातीस अनुसरुन सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा दावा केलेल्या उमेदवारांना पात्रतेनुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आरक्षणाचा लाभ घेता येईल.

उक्त मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश तसेच शासन निर्णयाच्या अनुषंगाने महामंडळातील वर्ग "क" आणि वर्ग "ड" संवर्गातील ८६५ पदांकरीता सरळसेवा भरती प्रक्रियेकरीता जुलै- ऑगस्ट २०१९ मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीमध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा दावा केलेल्या संबंधित उमेदवारांना अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) यापैकी कोणता लाभ घ्यावयाचा आहे,

याकरीता महामंडळातील सरळसेवेची वर्ग "क" आणि वर्ग "ड" मधील १४ संवर्गातील ८६५ रिक्त पदे भरण्यास विकल्प देणे आवश्यक आहे. सदर आरक्षणाचा तपशिल पुढीलप्रमाणे:

| अ. क्र. | पदाचे नाव | अ.जा. | अ.ज | वि.जा. अ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | ईडब्लुएस करीता पदे (एकूण पदांच्या १०%) | खुला (सर्वसाधारण) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | ५ | २ | १ | १ | १ | १ | ० | ७ | ४ | १३ | ३५ |
| २. | कनिष्ठ अभियंता (विवयां) | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | २ | १ | ३ | ९ |
| ३. | लघुलेखक (निम्न श्रेणी) | ३ | १ | १ | ० | १ | ० | ० | ४ | २ | ८ | २० |
| ४. | वरिष्ठ लेखापाल | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | ४ |
| ५. | सहायक | ३ | २ | ० | ० | १ | ० | ० | ५ | ३ | १७ | ३१ |
| ६. | लिपिक टंकलेखक | २८ | १५ | ६ | ५ | ८ | ४ | ४ | ४० | २१ | ८० | २११ |
| ७. | भूमापक | ४ | ३ | १ | ० | ० | १ | १ | ६ | ३ | १० | २९ |
| ८. | वाहनचालक (श्रेणी - २) | ४ | ४ | ० | ० | ३ | २ | १ | १ | ३ | ११ | २९ |
| ९. | तांत्रिकसहाय्यक (श्रेणी - २) | ४ | २ | २ | ० | २ | १ | १ | ६ | ३ | १३ | ३४ |
| १०. | जोडारी (श्रेणी - २) | ५ | ३ | १ | १ | २ | १ | १ | ८ | ४ | १५ | ४१ |
| ११. | पंपचालक (श्रेणी - २) | १० | ६ | २ | ५ | २ | ० | ० | १५ | ८ | ३१ | ७९ |
| १२. | विजतंत्री (श्रेणी - २) | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | ४ | ९ |
| १३. | शिपाई | २ | ४ | २ | ० | २ | १ | ० | ६ | ६ | ३३ | ५६ |
| १४. | मदतनीस | ३६ | १९ | ८ | १ | १० | ६ | ६ | ५३ | २८ | १११ | २७८ |
| | **एकूण** | **१०७** | **६२** | **२६** | **१३** | **३२** | **१७** | **१४** | **१५५** | **८८** | **३५१** | **८६५** |

उपरोक्त पदभरती/परीक्षांकरीता अर्जाद्वारे फक्त सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा दावा केलेल्या उमेदवारांनी प्रस्तुत दिनांक ३१ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने विकल्प देण्यासंदर्भातील कार्यवाही खालील प्रमाणे करणे आवश्यक आहे:-

१) संबंधित पदभरती / परीक्षांकरीता अर्जाद्वारे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा दावा केलेल्या उमेदवाराने अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) यापैकी कोणता लाभ घ्यावयाचा आहे, याबाबत विकल्प देणे आवश्यक आहे.

२) त्याअनुषंगाने महामंडळाच्या संकेतस्थळावर प्रवेशपत्र (Hall Ticket) उपलब्ध होतील त्यावेळी सदर प्रवेशपत्र डाऊनलोड करणेपूर्वी अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक या आरक्षणापैकी एका विकल्पाची निवड करणे अनिवार्य आहे.

३) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या लाभाकरीता विकल्प सादर करणाऱ्या उमेदवारांनी संबंधित जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटींची पुर्तताकरणे अनिवार्य आहे.

४) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी ३१ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे व प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

५) उपरोक्त कार्यपध्दती सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गाच्या आरक्षणाच्या अनुषंगाने विविध न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने शासनाकडून घेण्यात येणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

(अनिल गावीत)
प्रशासकीय अधिकारी
मऔविम, मुंबई-९३